महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.७१/पदभरती/का-४** **दि.०९-०८-२०२३**

## परिपत्रक क्र.२२

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील विविध शासकीय संस्था/कार्यालयातील गट-क संवर्गातील विविध ७७२ पदे भरण्याकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याबाबत दिनांक १६/०२/२०२३ रोजी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. जाहिरातीच्या अनुषंगाने **निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम)** Instructor (Pre-Vocational Courses) पदाकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांची सामायिक परीक्षा (CBT-१) रविवार दिनांक १६/०४/२०२३ रोजी घेण्यात आली.

सामायिक परीक्षेत (CBT-१) १२० गुणांपैकी किमान ४५% गुण (५४ गुण) प्राप्त करुन व्यावसायिक चाचणी (CBT-२) तसेच पुढील भरती प्रक्रियेकरिता पात्र ठरलेल्या **५४८६** उमेदवारांना व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता अर्ज भरण्यासाठी Link त्यांच्या Login ID मध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तरी व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता पात्र ठरलेल्या उमेदवारांनी खालील बाबींचे काटेकोर पालन करुन **दि.१०/०८/२०२३ ते १७/०८/२०२३ (रात्री ११.५९ पर्यंत)** या कालावधीत व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

१) व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता पात्र ठरलेल्या उमेदवारांनी ते ज्या पदाकरिता शैक्षणिक अर्हता, अनुभव धारण करीत असतील तसेच सदर पदांची व्यावसायिक चाचणी (CBT-२) देण्यास इच्छूक असतील त्या पदांची निवड करणे, विभागनिहाय पसंतीक्रम सादर करणे व निवड केलेल्या पदांच्या प्रमाणात जाहिरातीत नमूद केल्यानुसार प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र परीक्षा शुल्क अदा करणे आवश्यक राहील.

२) उमेदवाराने पदाची निवड न केल्यास/आवश्यक परीक्षा शुल्क न भरल्यास/परीक्षा शुल्क भरुनही सदर पदाच्या व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता उपस्थित न राहिल्यास सदर पदाच्या गुणवत्ता यादीकरिता उमेदवाराच्या नांवाचा विचार केला जाणार नाही. तसेच या संदर्भात कोणत्याही स्वरुपातील (ऑनलाईन/ऑफलाईन/ई-मेल/SMS/Whatsapp/टपालाने/हस्तदेय) तक्रार/विनंती विचारात घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३) व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता उमेदवारांची असलेली संख्या विचारात घेता राज्यातील ६ मुख्य परीक्षा केंद्रांवर व्यावसायिक चाचणी (CBT-२) चे आयोजन करण्यात येणार आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४) भरती प्रक्रियेत उमेदवार अंतिम निवडसूचीकरिता पात्र ठरल्यास उमेदवाराने संबंधित पदाकरिता ज्या विभागाचा पसंतीक्रम सादर केला असेल, केवळ त्याच विभागातील संबंधित पदाच्या निवडसूचीकरिता उमेदवाराचा विचार करण्यात येईल. उमेदवाराने पसंतीक्रम सादर न केलेल्या विभागातील संबंधित

पदाच्या निवडसूचीकरिता उमेदवाराचा विचार केला जाणार नाही अथवा पसंतीक्रम सादर करण्याकरिता/पसंतीक्रमात बदल करण्याची संधी उपलब्ध राहणार नाही. तसेच या संदर्भात कोणत्याही स्वरुपातील (ऑनलाईन/ऑफलाईन/ई-मेल/SMS/Whatsapp/टपालाने/हस्तदेय) तक्रार/विनंती विचारात घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

५) उमेदवाराने परीक्षेकरिता आवश्यक शुल्क अदा न केल्यास उमेदवार सदर पदाच्या व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता अर्ज करण्यास इच्छूक नसल्याचे समजण्यात येईल व सदर पदाच्या पुढील भरतीप्रक्रियेतून उमेदवार बाद होईल. तद्नंतर या संदर्भात कोणत्याही स्वरुपातील (ऑनलाईन/ऑफलाईन/ई-मेल/SMS/Whatsapp/टपालाने/हस्तदेय) तक्रार/विनंती विचारात घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६) उमेदवाराने अर्ज भरुन आवश्यक परीक्षा शुल्क ऑनलाईन अदा करुन अर्ज अंतिम केल्यानंतर उमेदवारास त्यात कोणताही बदल करता येणार नाही/बदल करण्याची संधी उपलब्ध राहणार नाही. तरी उमेदवारांनी अर्ज सादर करतांना योग्य ती दक्षता घ्यावी. तसेच या संदर्भात कोणत्याही स्वरुपातील (ऑनलाईन/ऑफलाईन/ई-मेल/SMS/Whatsapp/टपालाने/हस्तदेय) तक्रार/विनंती विचारात घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

७) व्यावसायिक चाचणी (CBT-२) चा Tradewise Syllabus व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर (www.dvet.gov.in) उपलब्ध आहे.

८) संबंधित पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

९) ऑनलाईन अर्जाची मुदत संपल्यानंतर व्यावसायिक चाचणी (CBT-२) चे वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहिर करण्यात येईल.

१०) सामायिक परीक्षा (CBT-१) व व्यावसायिक चाचणी (CBT-२) अंती (Normalization-Mean Standard Deviation Method लागू झाल्यास त्यानुसार) उमेदवाराने प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येणार असून उमेदवाराने सामायिक परीक्षा (CBT-१) व व्यावसायिक चाचणी (CBT-२) मध्ये एकूण २०० गुणांपैकी किमान ४५% (९०) गुण (Normalization-Mean Standard Deviation Method लागू झाल्यास त्यानुसार) प्राप्त करणे आवश्यक राहील. एकूण २०० गुणांपैकी किमान ४५% (९०) गुण (Normalization-Mean Standard Deviation Method लागू झाल्यास त्यानुसार) प्राप्त न केलेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीमध्ये समावेश करण्यात येणार नाही. तसेच सदर उमेदवार पुढील भरती प्रक्रियेतून बाद होतील. Normalization-Mean Standard Deviation Method लागू झाल्यास उमेदवारांच्या प्रत्यक्ष गुणात वाढ/घट होण्याची शक्यता असते.

तरी उमेदवारांनी याबाबतची नोंद घ्यावी.

**Link** - https://cdn3.digialm.com/EForms/configuredHtml/32330/81005/login.html

स्वाक्षरीत/-
(दि. अं. दळवी)
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.